**गर्भाशय काढून टाकण्याच्या शस्त्रक्रियेसंदर्भात मा.जिल्हाधिकारी बीड यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या दिनांक ११/०२/२०२० रोजीच्या सभेचे इतिवृत्त .**

दिनांक ९ एप्रिल २०१९ रोजी दि स्टेट हिंदू या इंग्रजी दैनिकात महाराष्ट्रातील बीड जिल्हयातील महिलांना गर्भ पिशव्या का नाहीत या मथळयाखाली प्रसिद्ध झालेल्या बातमीच्या अनुषंगाने मा.डॉ.निलम गोऱ्हे उप सभापती,विधान परिषद यांचे अध्यक्षतेखाली बीड जिल्हयातील गर्भाशय काढून टाकण्याच्या शस्त्रक्रियांसंदर्भातील राज्यस्तरीय समितीने तयार केलेल्या अहवालाचे अनुषंगाने या बैठकीमध्ये मा.श्री. राहूल रेखावार,जिल्हाधिकारी बीड यांचे अध्यक्षतेखाली चर्चा करुन अंमलबजावणीकरिता निर्णय घेण्यात आले.

**या बैठकीसाठी खालील अधिकारी उपस्थित होते.**

१) डॉ.अशोक थोरात - जिल्हा शल्य चिकीत्सक,जि.रु.बीड
२) डॉ.राधाकिशन पवार - जिल्हा आरोग्य अधिकारी,जि.प.बीड
३) श्री.चंद्रशेखर केकान - उप मुख्य कार्यकारी अधिकारी,(बा.क.) जि.प.बीड

या सभेमध्ये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

| अ.क्र. | अधिकारी व कार्यालयाचे नाव | सोपविण्यात आलेली कामे |
|---|---|---|
| १ | जिल्हा शल्य चिकीत्सक,जि.रु.बीड | १) खाजगी रुग्णालयांमधील एप्रिल २०१९ ते आजपर्यंतची गर्भाशयांच्या शस्त्रक्रियांची माहिती घ्यावी.व रुग्णालयनिहाय मागील ३ वर्षात त्या ठिकाणी झालेल्या शस्त्रक्रियांची सरासरी व वरील कालावधीत झालेल्या शस्त्रक्रियांची सरासरी यांच्यामधील प्रमाणाचा तुलनात्मक तक्ता तयार करणेबाबत सूचना देण्यात आल्या.<br>२) खाजगी रुग्णालयांमधील गर्भाशयांच्या शस्त्रक्रियांची महिनावार माहिती घेणेबाबत सुचना देण्यात आल्या;जेणे करुन कुठल्या कालावधीमध्ये जास्त शस्त्रक्रिया होतात याबाबतची माहिती मिळणे सोपे होईल. |
| २ | जिल्हा आरोग्य अधिकारी,जि.प.बीड | १) ऊसतोडीसाठी जाणाऱ्या महिलांना पुढील ६ महिने पुरतील या प्रमाणात सॅनिटरी पॅड उपलब्ध करुन देणेबाबत डी.पी.सी.अंतर्गत नाविन्यपूर्ण योजनेमधून निधीच्या तरतुदीसाठी प्रस्ताव सादर करावा.<br>२) तालुका आरोग्य अधिकारी यांनी विशेष इंद्रधनुष्य लसीकरण मोहिमेच्या कालावधीमध्ये बाहेर जिल्हयांमधून आलेल्या लसीकरणासाठी पात्र लाभार्थींच्या यादया व जिल्हयांतर्गत दुसऱ्या तालुक्यातून आलेल्या लसीकरणासाठी पात्र लाभार्थींच्या यादया पुढील बैठकीस येते वेळी सोबत घेऊन येणेबाबत सूचना दयाव्यात. |

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | | ३) ऊसतोड मुकादम यांची बैठक माहे ऑगष्टच्या पहिल्या पंधरवडयामध्ये आयोजीत करणे.<br>४) ऊसतोड मुकादमांच्या बैठकीमध्ये आयुष्यमान भारत व महात्मा फुले जीवनदायी योजना याबाबतची आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करुन ऊसतोड मजुरांना हेल्थ कार्ड व आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत सुचना देण्यात याव्यात.<br>५) मुकादम ऊसतोड मजुरांना घेऊन ज्या जिल्हयात जाणार आहेत; त्या जिल्हयातील आयुष्यमान भारत व महात्मा फुले जीवनदायी योजनेअंतर्गत असणाऱ्या रुग्णालयांच्या यादया संबंधीत मुकादमांना देण्यात याव्यात.<br>६) पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील ऊस तोडणी व वाहतूक शेत मजूर सुरक्षा विमा योजनेबाबत ऊसतोड मजुरांना माहिती देणेकरिता व शोधण्यात आलेल्या प्रत्येक पात्र लाभार्थ्यांकरिता आशा यांना मानधन म्हणून २५०/- रुपये देणेबाबतचा प्रस्ताव नाविन्यपूर्ण योजनेसाठी सादर करण्यात यावा.<br>७) ज्या ठिकाणी ऊसतोड कामगार राहतात त्या ठिकाणी रुग्णवाहिका वैद्यकीय अधिकारी आवश्यक साहित्य व औषध साठा घेऊन भेट देतील व रुग्णांची तपासणी करतील याचे नियोजन करण्यात यावे.<br>८) आशा व अंगणवाडी कार्यकर्तीमार्फत वैद्यकीय आपत्कालीन स्थितीमध्ये १०८ क्रमांकाला दूरध्वनी करणेबाबत ऊसतोड मजुरांना मागदर्शन व जनजागृती करणेबाबत कार्यवाही करण्यात यावी.<br>९) आशा व अंगणवाडी कार्यकर्तीमार्फत लसीकरणासाठी अपेक्षित असणाऱ्या लाभार्थीचा (मुले/गर्भवती महिला)पाठपुरावा करण्यासाठी एम.सी.टी.एस./आर.सी.एच.पोर्टल प्रणालीमध्ये लाभार्थ्यांचे नवीन राहण्याच्या ठिकाणाची माहिती मूळ आशामार्फत भरण्याची व त्या आधारे नवीन ठिकाणी असणाऱ्या कर्मचाऱ्यांना ती माहिती उपलब्ध करुन देण्याची सुधारणा केंद्र शासनाकडून करता येतील का याबाबत पाठपुरावा करण्यात यावा. |
| ३ | उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (बाल कल्याण),जि.प.बीड | १) कारखान्यांवर वास्तव्य करणाऱ्या कुटुंबांतील व्यक्तींची संख्या निश्चित करण्यात यावी व त्यासाठी आवश्यक स्नानगृह व स्वच्छता गृह यांच्या बांधकामासाठी निधी मागणी प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.बीड यांचेमार्फत जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करण्यात यावा. |

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | | २) कारखान्यांवर वास्तव्य करणाऱ्या कुटुंबांतील ० ते ६ वर्षे वयोगटातील बालकांसाठी पाळणाघर तयार करणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात यावा.<br>३) साखर कारखान्यांचे कार्यकारी संचालक यांना दि.२४ फेब्रुवारी २०२० रोजी सायंकाळी ५:०० वाजता बैठकीकरिता जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे उपस्थित राहणेबाबत कळविण्यात यावे.<br>४) साखर कारखान्यांचे कार्यकारी संचालक यांना स्नानगृह /स्वच्छता गृह व पाळणाघराकरिता आवश्यक जागा उपलब्ध करुन देणेबाबत चर्चा करावी.<br>५) कायमस्वरुपी फलकावर लावण्याकरिता योजनांच्या माहितीचा नमुना जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे समन्वयाने दिनांक २० फेब्रुवारी २०२० पर्यंत उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांना उपलब्ध करुन देण्यात यावा. |
| ४ | उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (पंचायत),जि.प.बीड | १) आरोग्य व महिला बाल कल्याण विभागांतर्गत योजनांची माहिती देणारे कायमस्वरुपी फलक प्रत्येक ग्रामपंचायतीकडे उपलब्ध असलेल्या १४ व्या वित्त आयोगातील तरतुदीमधून तयार करण्यात यावेत. |
| ५ | जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी बीड | रुग्ण तपासणीसाठी सहज उभा करता येणारा तंबू उपलब्ध करुन देणेबाबतची कार्यवाही दिनांक २० फेब्रुवारी २०२० पर्यंत करण्यात यावी. |
| ६ | जिल्हा पुरवठा अधिकारी बीड | ऊसतोड मजुरांना पुढील ६ महिने पुरेसे होईल एवढे आगाऊ धान्य देण्यात येण्याची कार्यवाही करुन याबाबतचा अहवाल दिनांक २० फेब्रुवारी २०२० रोजीच्या बैठकीत सादर करण्यात यावा. |
| ७ | कामगार उपायुक्त औरंगाबाद | साखर कारखान्यावर ऊसतोड कामगार म्हणून काम करणाऱ्या केंद्र शासनाने लागू केलेल्या असंघटीत कामगारांसाठी असंघटीत कामगार सामाजिक सुरक्षा अधिनियम २००८ ची अंमलबजावणी करुन शैक्षणीक व सुरक्षा विषयक योजना राबविण्यात याव्यात. |

वरील सुचनांप्रमाणे सर्व संबंधीत विभाग प्रमुखांनी केलेल्या कार्यवाहीचे अनुपालन अहवाल दिनांक २४ फेब्रुवारी २०२० रोजी सायंकाळी ५:०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे आयोजीत करण्यात आलेल्या बैठकीमध्ये सादर करणेबाबत सर्वांना सुचना देण्यात आल्या.

-स्वाक्षरित-
राहूल रेखावार (भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी बीड

प्रत माहितीस्तव:-
मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद बीड

Scanned by CamScanner

प्रत अनुपालनास्तव:-

१) कामगार उपायुक्त औरंगाबाद
२) जिल्हा शल्य चिकीत्सक,जि.रु.बीड
३) जिल्हा आरोग्य अधिकारी,जि.प.बीड
४) उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (बाल कल्याण),जि.प.बीड
५) उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (पंचायत),जि.प.बीड
६) जिल्हा पुरवठा अधिकारी बीड
७) जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी बीड

21/02/20

राहूल रेखावार (भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी बीड

Scanned by CamScanner